अंध व मूकबधीर कर्मचारी यांना एतदर्थ मंडळाची प्रादेशिक भाषा उत्तीर्ण होण्याबाबतची अट शिथील करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक- मभाप-२००५/७४५/प्र.क्र.६१/०६/२०ब,
मंत्रालय,मुंबई-४०००३२,
दिनांक- १४/०३/२००७.

संदर्भ:- १) शासन अधिसूचना,सामान्य प्रशासन विभाग क्र-मभाप-१०८७/१४/प्र.क्र.२/८७/२०, दिनांक ३० डिसेंबर १९८७.
२) शासन अधिसूचना,सामान्य प्रशासन विभाग,क्र.मभाप-१०९७/१६५२/प्र.क्र.७२/९७/२०ब, दिनांक ७ फेब्रुवारी २००१.
३) शासन परिपत्रक,वित्त विभाग क्र-सेनिवे-१०९९/३०२/सेवा-४, दि.१५नोव्हेंबर १९९९.
४) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र-मभाप-१००२/प्र.क्र.३८/०२/२०ब, दि. ८ मे २००३.

**प्रस्तावना:-**

शासन सेवेत कार्यरत असणारे अंध व मुकबधीर कर्मचारी यांना एतदर्थ मंडळाची मराठी / हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देणेबाबत शासन अधिसूचना दिनांक ३०/१२/१९८७ व दिनांक ७/२/२००१ च्या नियमावलीत तरतूद केलेली नाही. अंध व मुक बधीर यांचे माध्यमिक शालांत परीक्षेचे विषय वेगळे असल्याने काही कर्मचा-यांना मराठी विषय असतो तर हिंदी विषय नसतो. अंध व मूकबधीर कर्मचाऱ्यांची भाषीक असमर्थता विचारात घेऊन अशा कर्मचा-यांना मराठी, हिंदी व इंग्रजी (प्रथम) द्वितीय भाषा या पैकी कुठलीही एक भाषा घेऊन इतर दोन भाषांऐवजी दोन वैकल्पीक विषयांसह माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण करण्याची तरतूद शिक्षण व सेवायोजन विभाग,शासन निर्णय, क्रमांक-एसएससी-१२८१/२३९२८/एचएसई-१/(६३९६), दिनांक २९ मार्च १९८२ अनुसार देण्यात आलेली आहे. म्हणजेच अंध व मूकबधीर व्यक्तिला फक्त एका भाषेचे ज्ञान असणे पूरेसे ठरविण्यात आले आहे. अंध व मुकबधीर व्यक्ती शासन सेवेत आल्यानंतर त्यांना मराठी व हिंदी भाषा या दोन्ही

भाषा परीक्षा उत्तीर्ण करावी लागणे हे उचित नाही, म्हणून अंध व मूकबधीर व्यक्तिंना एतदर्थ मंडळाच्या मराठी भाषा परीक्षा किंवा हिंदी भाषा परीक्षा यापैकी एक भाषा परीक्षा उत्तीर्ण करण्याची अट शिथील करणेबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

वरील बाबी विचारात घेऊन शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, अंध व मुकबधीर अधिकारी/कर्मचारी यांना एतदर्थ मंडळाची मराठी भाषा परीक्षा किंवा हिंदी भाषा परीक्षा यापैकी एक भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येत आहे. यासाठी त्यांनी माध्यमिक शालांत परीक्षेच्या वेळी मराठी व हिंदी या विषयापैकी एक विषय घेऊन माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अशा अंध व मुकबधीर शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना एतदर्थ मंडळाच्या मराठी भाषा परीक्षा किंवा हिंदी भाषा परीक्षा यापैकी जी एक परिक्षा उत्तीर्ण झाली असेल अशा कर्मचाऱ्यांना दुसरी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट अनुज्ञेय राहील.प्रकरण परत्वे दुसरी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट अनुज्ञेय राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(अ.ना.कुलकर्णी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत :-

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई (पत्राने),
महालेखापाल-१(लेखा व अनुज्ञेयता)मुंबई,
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा)मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.
सर्व विभागीय सहायक भाषा संचालक, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नवीमुंबई.
संचालक, सेवायोजन कार्यालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग/निवड नस्ती. (का.२०ब)